# लडाख (भाग १) - मुक्काम तर येणारच

वर्तमानपत्रात होतकरुंसाठी चार ओळींचा मजकूर छापायचे ते दिवस होते. लोकसत्तामध्ये अशीच एक बातमी वाचून प्रभादेवीच्या पु. ल. देशपांडे कला अकादमीत लडाखवरचं छायाचित्रं प्रदर्शन पहायला वाकडी वाट करून मी गेलो होतो. चार-पाच फोटोग्राफरचं असलेलं ते प्रदर्शन पहातानाच लक्षात आलं की हा आत्माराम परब म्हणून जो कुणी आहे तोच यातला खरा 'राम'आहे. तशी तिथे सगळ्यावर पकड असलेला एक तरूण पाहून मात्र हा 'आत्माराम' असावा असं वाटत नव्हतं, कुणीतरी वयस्क असेल असं वाटलं होतं. चौकशी केल्यावर मात्र 'तो' हाच आहे असं समजलं. प्रदर्शन पाहून घरी आलो. दुसऱ्या दिवशीच्या कामाच्या रगाड्यातही आदल्या दिवशी पाहिलेलं प्रदर्शन विसरता येत नव्हतं. पुन्हा तिकडे गेलो. प्रदर्शन डोळे भरून पाहिलं आणि लडाखला जायची तीव्र इच्छा झाली. आत्माराम परबांचा सहकारी अनिल (तो आपली ओळख अणिल अशी करून देत होता.) सवाने याच्याजवळ प्राथमिक चौकशी केल्यावर आणि लडाखला जायचं आहे म्हटल्याबरोबर त्याने माझी आत्माराम परबांशी गाठ घालून दिली. त्यावर्षी २००६ सालच्या ऑगस्टची सहल नक्की केली. फोन नंबरची देवघेव केली आणि जुलैपर्यंत मनात लडाखला जायचे मांडे खात बसलो. जुलैमध्ये त्यांचा फोन आला आणि ते जुलैच्या बॅचला यायचं सुचवू लागले. ऑगस्टची सहल रद्द झाली होती आणि मला जुलैची तारीख चालणार नव्हती.

पुन्हा डिसेंबर महिन्यात लोकसत्तामध्ये 'गोठलेलं लडाख' हा आत्माराम परबांचा लेख छापून आला आणि तो वाचून परत एकदा लडाखने उसळी घेतली. मग मार्च २००७ मध्ये पुन्हा एकदा पु. ल. देशपांडे कला अकादमीत आत्माराम परबांचं लडाखवरचं छायाचित्रं प्रदर्शन लागलं. लगोलग मी प्रभादेवी गाठली. बोलणं झालं, २५ जुलै २००७ ची सहल नक्की केली, प्राथमिक रकमेचा चेक दिला. काही दिवसानंतर लडाखची माहिती काढता काढता काही शंका मनात आल्या त्याचं निवारण करण्यासाठी आत्माराम परबांची भेट मागितली. ज्या दिवशीची वेळ ठरली त्याचं दिवशी मला एका लग्नाच्या रिसेप्शनला जावं लागलं, ते अर्धवट आटोपून मी सांताकृझहून मुलूंडला निघालो. परबांच्या घरी जायला उशीरच होणार होता. रात्रीचे दहा वाजून गेले होते. मग पुन्हा फोन करून एवढ्या उशीरा आलो तर चालेलं का? असं विचारलं ते हो म्हणाले आणि १०.३० च्या दरम्याने त्यांच्या घरी पोहोचलो. साहेब घरी नव्हतेच! ११ वाजायच्या दरम्यान ते प्रकटले आणि मी थोडक्यात शंका निरसन करून घेतलं. त्यांची बॅग भरण्याची तयारी चालू झाली तेव्हा विचारल्यावर समजलं की दुसऱ्याच दिवशी पहाटे ते लडाखला टूर घेवून निघणार होते, नुकतेच केस कापून आले होते. म्हणजे मी झोपमोड केली नाही तर, या समाधानात मी त्यांचा निरोप घेतला.

जुलै महिना जवळ आला तशी मी लडाखला जातोय ही बातमी विलास आम्ब्रे, नितीन कीर, डॉ. रमेश मडव या मित्रवर्यानां समजली आणि तेही माझ्याबरोबर सहलीला यायला तयार झाले. डॉ. मडव तर मी जातोय म्हणून सहलीला आठ दिवस असतानाच ‘मला बी सहलीला येवद्या की’ म्हणत सामील झाले. सहलपूर्व माहिती देण्यासाठी दादरला एक मिटींग झाली त्यात गरम कपडे घ्या एवढं मनावर ठसलं होतं. तर... थोडीशी माहिती आणि प्रचंड उत्साह बरोबर घेऊन आम्ही लडाख सफरीवर जायला तयार झालो. प्रदर्शनातली छायाचित्रं मनात रुंजी घालत होती. आणि जायचा दिवस उजाडला, वांद्रा टर्मिनसवरून निघणाऱ्या पश्चिम एक्स्प्रेसने स्टेशन सोडलं तेव्हापासूनच मन इंजिनापुढे धावत होतं. क्रमश: ...

मुक्काम तर येणारच
प्रवास सुकर झाला पाहिजे
आनंदाने हसत हसत
आपण हातभार लावला पाहिजे

**- नरेंद्र प्रभू**

http://prabhunarendra.blogspot.com/
http://shabdshabd.blogspot.com/